सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १४६ | सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

# भूमी सुपोषण चळवळ जनजागराची जबाबदारी सर्वांचीच

## समाजातील सर्वच क्षेत्रांतील घटकांनी महाशोभायात्रेत सहभागाचे मान्यवरांचे आवाहन






**अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात 'माझा संकल्प-भूमी सुपोषण' चळवळ जनजागरण महाशोभायात्रेच्या आयोजन-नियोजनाच्या रविवारी झालेल्या बैठकीत मार्गदर्शन करताना आमदार अनिलदादा पाटील. व्यासपीठावर उपस्थित खासदार स्मिताताई वाघ, माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, खा. शि. मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, संचालक योगेश मुंदडे, जितेंद्र जैन, हरी भिका वाणी, ओम शांती परिवाराच्या दीदी, प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव व समोर उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवर. (छायाचित्र : मयूर चौधरी)**

**मग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आपला परमपवित्र भारत देश कृषीप्रधान आहे. गेली कित्येक वर्षे आपण सुजलाम्- सुफलाम् स्थितीची अनुभूती घेतली आहे. मात्र, काही वर्षांपासून किंबहुना सद्यःस्थितीत देशातील शेती, शेतकरी, शेतमजूर व कृषी उत्पन्न आदींची स्थिती अतिशय दयनीय झाली आहे. आपल्या पूर्वजांनी पिढ्यान् पिढ्या सेंद्रीय व सकस शेती केल्याने ते कायम सुदृढ होते. त्यामुळे देशातील कृषी क्षेत्रास पुनर्वैभव व निरामयता प्राप्त करून देण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच आहे. अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांनी भूमी सुपोषण चळवळ जनजागरासाठी घेतलेला पुढाकार अभिनंदनीय व कौतुकास्पद आहे. त्या अनुषंगाने बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी अमळनेर शहरात काढण्यात येणाऱ्या महाशोभायात्रेत समाजातील सर्वच क्षेत्रांतील घटक व माता-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विविध मान्यवरांनी केले.

येथील श्री मंगळग्रह मंदिरात 'माझा संकल्प-भूमी सुपोषण' चळवळ जनजागरण महाशोभायात्रेच्या आयोजन-नियोजनासंदर्भात रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी बैठक घेण्यात आली. त्यात महाशोभायात्रेतील सहभाग, मार्ग, जनजागृतीपर घोषवाक्य आदींबाबत चर्चा करण्यात आली. आमदार अनिलदादा पाटील अध्यक्षस्थानी होते. खासदार स्मिताताई वाघ, माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, खानदेश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, संचालक हरी भिका वाणी, योगेश मुंदडे, जितेंद्र जैन, प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, ओम शांती परिवाराच्या विद्यादीदी व आरतीदीदी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर होते. बैठकीस आजी-माजी नगरसेवक, विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संघटनांचे पदाधिकारी, महिला बचत गट, अनेक गावांतील सरपंच-उपसरपंचांसह महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी भूमी सुपोषण चळवळ काय आहे? याविषयीची सविस्तर माहिती दिली. १८ फेब्रुवारी रोजी निघणाऱ्या महाशोभायात्रेचे स्वरूप सांगितले. तसेच १९ मार्च २०२६ रोजी वर्षप्रतिपदा आहे. हा दिवस भूमी मातेचा जन्मदिवस असतो. आपल्या श्री मंगळग्रह मंदिरात भूमी माता व भूमिपुत्र श्री मंगळग्रह देवता यांच्या मूर्ती असल्याने देशव्यापी चळवळीचा प्रारंभ अमळनेर येथून होत आहे. शेतकऱ्यांनी मोठा सहभाग नोंदवून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

दरम्यान, १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थान येथून महाशोभायात्रेचा प्रारंभ होईल.

महाशोभायात्रा सुरु होण्यापूर्वी सर्वांना पोटभर नाश्ता देण्यात येणार आहे. महाशोभायात्रा मार्गावरही ठिकठिकाणी गोळ्या-बिस्कीट हलका-फूलका नाश्ता व जलपानाची व्यवस्था केली जाणार आहे. शोभायात्रेतील सहभागींसाठी श्री मंगळग्रह मंदिरात भोजन व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

### स्मृती (स्व.) अजितदादांच्या..!



श्री मंगळग्रह मंदिराला केवळ (स्व.) अजितदादांच्या सांगण्यावरूनच १५ एकर जागा मिळाली आहे. त्यामुळे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अजितदादांच्या उपकारांची जाणीव असल्याने मंदिर परिसरात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ काहीतरी करण्याची योजना तयार आहे.




भूमि सुपो[illegible] एव सरक्षण अभियान

### अमळनेरचे नाव देशपातळीवर पोहोचवावे : आमदार अनिलदादा पाटील



भूमी सुपोषण जनजागर चळवळीची सुरूवात श्री मंगळग्रह मंदिरातून होत आहे, याचा अभिमान आणि अत्यानंद आहे. केंद्रीय कृषीमंत्र्यांसह राज्यातील मंत्र्यांची उपस्थिती या कार्यक्रमास लाभणार आहे. यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती होणे गरजेचे आहे. महाशोभायात्रेत सर्वांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा. सरपंच, विविध कार्यकारी संस्था या ग्रामीण भागाचा कणा आहे. त्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होण्यासाठी जनजागृती केली जाईल. यासाठी आपल्या पक्ष कार्यालयातून ग्रामीण भागातील संस्थांशी आमचे कार्यकर्ते संपर्क साधतील. शेतकऱ्यांशीही संवाद साधतील. शेतकऱ्यांच्या सहभागासाठी विशेष नियोजन केले जाईल. भूमी सुपोषण ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. हा कार्यक्रम यशस्वी करून अमळनेरचे नाव देशपातळीवर पोहोचवावे.

### शेतकऱ्यांचा सहभाग महत्त्वाचा : खासदार स्मिताताई वाघ



अती उत्पन्न घेण्याच्या नादात जमिनीचा कस जात आहे. पेस्टिसाइड्स, रासायनिक खतांमुळे सकस आहार मिळत नाही. युरियापासून दूध बनविले जात आहे. आपण खाणार काय? महाराष्ट्र कृषीप्रधान राज्य आहे. त्यामुळे आपल्यालाच आता चांगली सुरूवात करायची आहे. अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरातून जागतिक स्तरावरील संस्थेच्या भूमी सुपोषण चळवळ जनजागराची सुरूवात होते, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. सर्वच घटकांनी महाशोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. मात्र, पुढचा टप्पाही खूप महत्त्वाचा आहे. याचे सूक्ष्म नियोजन आपल्याला सर्वांना करावयाचे आहे. १९ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या भूमी सुपोषण कार्यक्रमास जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

### कार्यक्रम अभूतपूर्व करावा : माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील



मातीचे सुपोषण नसल्याने आपण कुपोषित होत चाललो आहोत. आपल्याला जे काही मिळते ते भूमी मातेतूनच अर्थात शेतीतून मिळते. चांगले जे येते ते मातीतूनच येते. भूमीला मातेचा दर्जा देण्यात यावा. मंगळग्रह सेवा संस्थेने भूमी सुपोषण जनजागर चळवळीचे विधायक कार्य हाती घेतले आहे. यासाठी शेतकऱ्यांचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे. भूमीची सेवा करण्याची मला संधी मिळते, ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी भूमी सुपोषण जनजागर चळवळीसाठी केलेले सूक्ष्म नियोजन कौतुकास्पद आहे. १८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महाशोभायात्रेत सर्वच घटकांनी सहभागी होऊन जनजागृती करावी. तसेच १९ मार्चचा कार्यक्रम अभूतपूर्व करावा.

# विना परवाना गोवंश वाहतूक

## अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त; चालकावर गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मिलचाळ परिसरात गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या चारचाकी मालवाहू वाहनास पोलिसांनी पकडून कारवाई केली आहे. ही घटना रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी मालवाहू वाहन ताब्यात घेण्यात आले. चालकाविरूद्ध येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, की गोपनीय शाखेचे पोलीस रविवारी पहाटे गस्तीवर होते. पहाटे चार वाजेच्या सुमारास चेकिंग पूर्ण करून परत येत होते. त्यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी त्यांना अमळनेर-शिरपूर रस्त्यावरील मिलचाळ भागात काही गोरक्षकांनी गोवंश वाहतूक करणारी गाडी अडवून धरली आहे असे सांगितले. त्यानंतर पोलिस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. तेथे सागर ठाकुर, विशाल पाटील, प्रसाद महाजन व सुरेंद्रमोहन अग्निहोत्री यांनी मारुती सुझुकी कॅरी मालवाहू (एमएच१८बीजी ९१२०) ही गाडी पकडून ठेवली होती. पोलिसांनी चालकास नाव, पत्ता व जनावर वाहतुकीचा परवाना याबाबत विचारणा केली असता त्याने त्याचे नाव सरफराज बेग फरीदबेग मिर्झा (वय २१, रा. अंबिका नगर, केजी रोड, शिरपूर) असे सांगितले. त्याच्याकडे जनावरे वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे तसेच पशुवैद्यकीय तपासणीही न केल्याचे निष्पन्न झाले. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून गोवंशाच्या कानावरील टॅग तपासणी करण्यात आली. मात्र, त्यांना कोणतीही नोंद आढळून आली नाही. त्यामुळे अवैधरित्या खरेदी-विक्री व वाहतूक होत असल्याचा संशय बळावला. पंचनाम्यात एक पांढऱ्या रंगाचा लाल पट्टे असलेला अंदाजे ३ वर्षांचा गोऱ्हा (किंमत १० हजार रुपये), एक काळ्या रंगाचा अंदाजे ५ वर्षांचा गोऱ्हा (१५ हजार) व मालवाहू वाहन (२ लाख रुपये) असा एकूण २ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




**अमळनेर : पात्र रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे हिरवा झेंडा दाखवून रवाना करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे खजिनदार गिरीश कुळकर्णी. शेजारी मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, विश्वस्त डी. ए. सोनवणे, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जी. चव्हाण, जनसंपर्क अधिकारी शरद कुळकर्णी व सेवेकरी.**

# महाशिवरात्रीनिमित्त श्री मंगळग्रह मंदिरात लघु रुद्राभिषेक, भजनसंध्या; भाविकांची गर्दी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाशिवरात्रीनिमित्त येथील श्री मंगळ ग्रह मंदिरात रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता गोरज मुहूर्तावर विश्व कल्याणासाठी लघू रुद्राभिषेक, शृंगार सेवा करण्यात आली. बाजार समितीचे संचालक सचिन पाटील यांनी सपत्निक वेदमंत्रांच्या जयघोषात अभिषेक केला. श्री मंगळेश्वर महादेवांना सेवा अर्पण करण्यात आली.

शुभम वैष्णव गुरुजी, सारंग पाठक गुरुजी, जयेंद्र वैद्य गुरुजी, प्रसाद भंडारी गुरुजी, अथर्व कुळकर्णी, परशूराम शर्मा, वैभव लोकाक्षी, चंद्रकांत जोशी, मेहूल कुळकर्णी आदींनी पौरोहित्य केले. सायंकाळी ७ ते ९ या वेळात भक्तीमय वातावरणात भजन संध्या कार्यक्रम झाला. यावेळी भाविकांची मोठी उपस्थिती होती. महादेवांच्या नामस्मरणाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. श्री मंगळ ग्रह देवता व श्री मंगळेश्वर महादेव मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली. दरम्यान, आज श्री मंगळ ग्रह मंदिरात श्री मंगळेश्वर महादेवांच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी झाली होती.



**अमळनेर : श्री मंगळ ग्रह मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त सपत्निक लघु रूद्राभिषेक करताना बाजार समितीचे संचालक सचिन पाटील.**

# मोफत मोतिबिंदू तपासणी शिबीर

## शस्त्रक्रियेसाठी ५३ रूग्ण पनवेल येथे रवाना

### मंगळग्रह सेवा संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळ ग्रह सेवा संस्था, ना. गुलाबरावजी पाटील सोशल फाउंडेशन (पाळधी), संकल्प सेवा फाउंडेशन (धनवाडी) व आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) यांच्यातर्फे रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी मंगळ ग्रह मंदिरात मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर झाले. या शिबिराचा १५५ रुग्णांनी लाभ घेतला. त्यापैकी ५३ रुग्ण मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले होते. रुग्णांना दुपारी श्री मंगळग्रह मंदिर येथून विशेष वाहनाने आर. झुणझुणवाला शंकरा आय हॉस्पिटल (पनवेल) येथे शस्त्रक्रियेसाठी रवाना करण्यात आले.

या शिबिरात अमळनेर, धुळे, चोपडा, जळगाव, एरंडोलसह तालुक्यातील ग्रामीण भागातील रूग्णांचा सहभाग होता. डॉ. राहुल चौधरी, विजय बामणे, सागर पाटील, भूपेंद्र वाघ, सोनाली परांदे, प्राजक्ता गायकवाड (नेत्ररोग तज्ज्ञ, शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल) यांनी तपासणी केली होती. मंगळ ग्रह सेवा संस्थेचे सचिव एस. बी. बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी, रजनीकांत पाटील, प्रमोद पाटील, भूषण पाटील, हरीश चव्हाण, अमोल मराठे, नितेश बारी आदींनी सहकार्य केले. दरम्यान, सदर शिबिर दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी श्री मंगळ ग्रह मंदिर येथे नियमितपणे होते, याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

### राष्ट्रवादी विलीनीकरण; मोठे गूढ

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा पोपट मेला का? असा प्रश्न राष्ट्रवादीतील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनाच नाही तर सर्वसामान्यांनाही पडला आहे. कारण काही बोटावर मोजण्याइतके नेते सोडले, तर या विषयावर बडे नेते भाष्य करण्याचे टाळत असल्याचे अथवा चेंडू टोलवण्याची कसरत करताना दिसत आहेत. सध्या अजितदादांच्या विमान अपघातावरून संशयाचे धुके गडद झाले आहे. त्यात २७ जानेवारी २०२६ रोजीच्या घडामोडींकडे अंगुली निर्देश करत आमदार रोहित पवार काहीतरी इंगित करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. पण त्यांनी अजूनही कुणाचे थेट नाव घेतलेले नाही. या ताज्या घडामोडींमुळे दोन्ही राष्ट्रवादींत नाराजीनाट्य तर सुरू नाही ना, याची कुजबुज सुरू आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा मागे पडल्याचे सध्या तरी समोर येत आहे. अजितदादा हयात असताना त्यांनी दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाविषयी हालचाली केल्या, असा दावा करण्यात आला.**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित लढल्या. त्यानंतर या १२ फेब्रुवारी रोजी अजितदादा हे राष्ट्रवादी विलीनीकरणाची घोषणा करणार होते, असा दावा शरद पवार गोटातून करण्यात आला. तर दुसरीकडे अजितदादा गटातील बड्या नेत्यांनी याबाबत कानावर हात ठेवले. दादांनी आपल्याला याबाबत काहीच माहिती दिली नाही, असा त्यांचा दावा आहे. तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अजितदादा आणि जयंत पाटील यांच्यात विलीनीकरणाची चर्चा सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादी पक्षात विलीनीकरणाविषयी कुणाची नाराजी आहे, याबाबत तर्क-वितर्क लढवले जात आहेत. अजितदादांच्या राष्ट्रवादीचे बडे नेते याविषयी नाखूष असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून तरी समोर येत आहे. विलीनीकरणाचा चेंडू या कोर्टातून त्या कोर्टात टोलावल्या जात आहे. तर दुसरीकडे आमदार रोहित पवार हे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत सोमवारी बोलणार आहेत. १६ फेब्रुवारी रोजी रोहित पवार पत्रकार परिषद घेणार आहेत.**

**अजितदादांच्या गटातील काही नेत्यांना विलीनीकरणानंतर सत्तेत वाटा द्यावा लागणार असल्याने ते एकत्रिकरणाच्या विरोधात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर या सर्व घटनाक्रमात उपमुख्यमंत्री आणि पक्षाच्या प्रमुख सुनेत्रा पवार या अद्यापही मौन बाळगून आहेत. त्यांनी विलीनीकरण आणि इतर मुद्यांवर अद्याप मत व्यक्त केलेले नाही. त्यांनी कोणतेही जाहीर वक्तव्य अद्याप केलेले नाही. तर अजितदादांचे पुत्र पार्थ आणि जय पवार यांनी सुद्धा या विषयावर पत्ते उघड केलेले नाहीत. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची कोणतीही अपडेट सध्या तरी समोर आलेली नाही. उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार या विषयावर मत मांडतील त्यावेळी विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम मिळेल. अजितदादांच्या गटातील काही नेत्यांना विलीनीकरणानंतर सत्तेत वाटा द्यावा लागणार असल्याने ते एकत्रिकरणाच्या विरोधात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर या सर्व घटनाक्रमांत उपमुख्यमंत्री आणि पक्षाच्या प्रमुख सुनेत्राताई पवार या अद्यापही मौन बाळगून आहेत.**

# किती आहे राजपाल यादवची एकूण संपत्ती?

## कोट्यवधींची प्रॉपर्टी असूनही का खावी लागतेय जेलची हवा?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकेकाळी करोडोंचे मानधन घेणारा अभिनेता आज म्हणतोय 'माझ्याकडे पैसे नाहीत'; जाणून घ्या राजपाल यादवच्या संपत्तीचा संपूर्ण लेखाजोखा चेक बाऊन्स प्रकरणात दोषी ठरल्यामुळे राजपाल यादव सध्या सहा महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा भोगत आहे. गेल्या आठवड्यात त्याला अटक करण्यात आली असून, २ फेब्रुवारीला त्याच्या जामीन अर्जावर सुनावणी होणार आहे.

**८० कोटींची संपत्ती**

राजपाल यादवची एकूण संपत्ती सुमारे ८० कोटी रुपये इतकी आहे. त्याची कमाई प्रामुख्याने चित्रपट, ब्रँड जाहिराती, स्टेज शो आणि रिअल इस्टेटमधील गुंतवणुकीतून येते.

**एका चित्रपटाचे मानधन**

राजपाल एका चित्रपटासाठी साधारण १ ते २ कोटी रुपये मानधन घेतो. मोठ्या प्रोजेक्ट्ससाठी तो ३ कोटींपर्यंत फी आकारतो, तर जाहिरातींसाठी १ कोटी रुपये घेतो.

**कमाईचा आकडा**

त्याची महिन्याची कमाई सुमारे ३० ते ३५ लाख रुपये आहे. वर्षाला तो ४ ते ७ कोटी रुपये कमावतो. स्टेज शोसाठी तो १० ते १५ लाख रुपये मानधन घेतो.

**मध्य प्रदेशातील मालमत्ता**

त्याच्याकडे मध्य प्रदेशातील रतिकेडा गावात ५००० स्क्वेअर फुटांचे घर आणि २.२ हेक्टर शेती आहे. या दोन्ही मालमत्तांची किंमत सुमारे ७० लाख रुपये आहे.

**बँक जप्तीची कारवाई**

उत्तर प्रदेशातील शाहजहाँपूर येथील राजपालची वडिलोपार्जित मालमत्ता ११ कोटींच्या थकीत कर्जामुळे सेंट्रल बँक ऑफ इंडियाने ऑगस्ट २०२४ मध्ये सील केली आहे.

**९ कोटींचा चेक बाऊन्स**

९ कोटी रुपयांच्या चेक बाऊन्सप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने दिलासा नाकारल्यानंतर त्याने तिहार जेलमध्ये आत्मसमर्पण केले. 'माझ्याकडे पैसे नाहीत, मी काय करू?' अशी हतबलता त्याने व्यक्त केली होती.

**बॉलिवूडचा पाठिंबा**

संकट काळात सलमान खान, अजय देवगण, सोनू सूद आणि वरुण धवन यांनी त्याला पाठिंबा दिला आहे; तर मीका सिंग आणि गुरु रंधावा यांनी त्याला आर्थिक मदतीचा शब्द दिला आहे.

**आगामी चित्रपट**

सध्या तुरुंगात असला तरी त्याचे 'भूत बंगला' (१० एप्रिल २०२६) आणि अक्षय कुमारसोबतचा 'वेलकम टू द जंगल' हे मोठे चित्रपट प्रदर्शनासाठी रांगेत आहेत.

# महिला अन्याय विरोधी समितीने सांधला विकृत हट्टापाई मोडलेला संसार..!

## 'व्हॅलेंटाईन डे' ला पती-पत्नीची पुनर्भेट...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

"संसार हा विश्वास आणि आदरावर टिकतो. बाहेरील विकृती घरात आणल्यास नात्याची वीण उसवते. तरुणांनी आभासी जगातील गोष्टी आणि वास्तव यातील फरक समजून घेणे गरजेचे आहे." असे आवाहन महिला अन्याय विरोधी समितीने केले आहे.

अमळनेर : पॉर्न फिल्म्समधील दृश्यांची भुरळ पडून आपल्या पत्नीकडेही तशाच प्रकारच्या अनैसर्गिक आणि बीभत्स कृत्यांचा हट्ट धरणे एका पतीला चांगलेच महागात पडले होते. या विकृत मागणीमुळे घटस्फोटाच्या उंबरठ्यावर असलेला हा संसार अमळनेर येथील 'महिला अन्याय विरोधी समिती'च्या कौशल्यामुळे पुन्हा एकदा बहरला आहे.

विशेष म्हणजे, १४ फेब्रुवारी म्हणजेच 'व्हॅलेंटाईन डे'चे औचित्य साधून या जोडप्याने पुन्हा एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. या बाबत माहिती अशी, की मालेगाव येथील सुशीला (नाव बदललेले) हिचा विवाह अमळनेर येथील प्रकाश (नाव बदललेले) याच्याशी झाला होता. लग्नानंतर अवघ्या ४-६ महिन्यातच प्रकाशने पत्नीकडे अनैसर्गिक शारीरिक संबंधांची मागणी करण्यास सुरुवात केली. पॉर्न व्हिडिओमध्ये दाखविले जाणारे प्रकार करण्यासाठी तो पत्नीवर दबाव टाकू लागला. सुशीलाला हे प्रकार किळसवाणे वाटत असल्याने तिने वारंवार नकार दिला.

मात्र, यामुळे संतापलेल्या प्रकाशने तिला मारहाण सुरू केली आणि "तू मला संसारसुख देत नाहीस" असा खोटा आरोप करून तिला कुटुंबात बदनाम केले. या जाचाला वैतागून सुशीलाने माहेरी हा प्रकार सांगितला. संतप्त माहेरच्या मंडळींनी प्रकाशला चांगलाच धडा शिकवून सुशीलाला आपल्यासोबत नेले. या विकृत स्वभावामुळे गेल्या दोन वर्षांपासून हे दाम्पत्य वेगळे राहत होते. प्रकरण इतके विकोपाला गेले, की सुशीलाने घटस्फोटासाठी कायदेशीर नोटीस पाठविली होती.

अखेर प्रकाशच्या पालकांनी 'महिला अन्याय विरोधी समिती'चे धनंजय सोनार यांची भेट घेऊन मदतीची विनंती केली. समितीने तातडीने हालचाली करत प्रकाशचे समुपदेशन केले. "कामक्रिडा हा परस्पर संमतीने आणि स्वच्छ मनाने करण्याचा विषय आहे, तिथे विकृतीला स्थान नाही," अशा शब्दांत धनंजय सोनार व सहकाऱ्यांनी प्रकाशला 'आरसा' दाखवला. स्वतःची चूक उमजल्यानंतर प्रकाशने पश्चात्ताप व्यक्त करीत सुशीलासोबतच संसार करायचे वचन दिले. समितीने सुशीला आणि तिच्या कुटुंबीयांशी संवाद साधून प्रकाशच्या बदललेल्या मानसिकतेबद्दल खात्री दिली. १४ फेब्रुवारीला या दोघांमध्ये समेट घडवून आणला आणि तुटलेला संसार पुन्हा सांधला गेला. याबद्दल दोन्ही कुटुंबांनी समितीचे आभार मानले. या यशस्वी मध्यस्थीसाठी धनंजय सोनार यांना निशा विसपुते, निवृत्त फौजदार बाळकृष्ण शिंदे, राजकुमार कोराणी, मंगला विसपुते, संगीता बिऱ्हाडे, विनोद राऊळ, अनिल चौधरी, मिठाराम चव्हाण, कौशल्याबाई पाटील, महेंद्र पाटील, अरुण पाटील, अभिषेक पाटील आणि गुलाब घोडगावकर यांची मदत झाली.



*अमळनेर : शौर्य प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना माजी नगरसेवक प्रताप शिंपी.*

# शिव जन्मोत्सवानिमित्त शौर्य प्रदर्शनाचे उद्घाटन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिव जन्मोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेसह शौर्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या लाठी-काठी फिरविण्याच्या कार्यक्रमाचे रविवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी माजी नगरसेवक प्रताप शिंपी यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. अष्टविनायक नगरमधील लेआउटचे संचालक अमोल पाटील व पराग चौधरी यांच्या सहकार्याने हे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवचरित्र, शौर्यपरंपरा व युवकांनी अंगीकारावयाच्या शिस्त-संस्कारांवर मार्गदर्शन केले. तसेच लाठी-काठी फिरविण्याच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची दाद मिळवली. अमळनेर तालुक्यातील युवकांसह आबालवृद्ध, माता-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रवींद्र मोरे यांना राज्यस्तरीय 'ज्ञानवंत पत्रकार' पुरस्कार प्रदान



*जळगाव : आमदार राजूमामा भोळे यांच्या हस्ते 'ज्ञानवंत पत्रकार' पुरस्कार स्वीकारताना पत्रकार रवींद्र मोरे. व्यासपीठावर उपस्थित महापौर दीपमाला काळे व मान्यवर.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव येथे रविवार, दि. फेब्रुवारी रोजी झालेल्या 'सकल ज्ञान महोत्सव सन्मान व बक्षीस वितरण सोहळा २०२६' या राज्यस्तरीय कार्यक्रमात येथील पत्रकार रवींद्र मोरे यांना 'ज्ञानवंत पत्रकार' पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. जळगावचे आमदार राजुमामा भोळे अध्यक्षस्थानी होते. नवनिर्वाचित महापौर दीपमाला काळे, माजी महापौर जयश्री महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक, राजकीय आणि लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने लेखणी चालवत पत्रकारितेचे सामाजिक भान जपणाऱ्या रवींद्र मोरे यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत आयोजक जनमत प्रतिष्ठान व मुक्ताई महिला बहुउद्देशीय संस्था यांनी त्यांना या पुरस्कारासाठी निवड केली होती. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते माजी डायट प्राचार्य निलकंठ आप्पा गायकवाड यांनी श्री. मोरे यांच्या सत्यनिष्ठ व जनहितैषी पत्रकारितेचे विशेष कौतुक करत, "माध्यम हे समाजाचे आरसे असते, आणि रवींद्र मोरे यांनी त्या आरशाला प्रामाणिकपणाची धार दिली आहे," असे गौरवोद्गार काढले. याप्रसंगी आयोजक संस्थेचे अध्यक्ष पंकज नाले व मुक्ताई संस्थेच्या अध्यक्षा सौ. निताताई मंगलसिंग सोनवणे यांनी श्री. मोरे यांच्या पत्रकारितेतील योगदानाचे कौतुक केले. श्री. मोरे यांनी हा पुरस्कार माझ्या सहकाऱ्यांचा आणि वाचकांचा आहे. समाजातील समस्यांवर लेखणी चालवण्याचे कार्य पुढेही अविरत सुरू राहील, असे सांगितले. पुरस्काराबद्दल श्री. मोरे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# अमळनेर येथून व्यापारी बेपत्ता

## माहिती मिळाल्यास संपर्क साधण्याचे पोलिसांकडून आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पद्मजा अपार्टमेंट परिसरातील रहिवासी कैलास भिमराव ढोकळे (वय ४१) हे मंगळवार दि. १३ जानेवारी २०२६ रोजी सकाळपासून बेपत्ता झाले आहेत. श्री स्वामी समर्थ केंद्रात जाऊन येतो, असे सांगून ते निघाले होते. याबबात येथील पोलीस ठाण्यात हरविल्याची नोंद झाली आहे. कुणाला त्यांची माहिती मिळाल्यास अथवा दिसल्यास संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. पोलिसांनी सांगितले, की कैलास ढोकळे हे सोने शुद्ध करण्याचा व्यवसाय करतात.



त्यांची काही दिवसांपासून त्यांची प्रकृती बिघडली होती. १३ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास त्यांनी एका कारचालकास धुळे येथे दवाखान्यात जाण्यासाठी फोन करून साडेदहा वाजेपर्यंत घरी येण्यास सांगितले होते. त्यानंतर सकाळी सुमारे १० वाजता स्वामी समर्थ केंद्रात दर्शन करून येतो, असे पत्नीला सांगून ते घराबाहेर पडले. दुपारी २ वाजेपर्यंत ते परत न आल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध सुरू केली. त्यांचा मोबाईल घरीच असल्याने शंका अधिक बळावली. अमळनेर शहर, परिसर तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र, ते कोठेही सापडले नाहीत. याप्रकरणी त्यांच्या पत्नीने दिलेल्या माहितीवरून येथील पोलीस ठाण्यात हरविल्याची नोंद झाली आहे. जळगाव नियंत्रण कक्षालाही अहवाल पाठविण्यात आला आहे. हवालदार प्रमोद पाटील तपास करीत आहेत.

# कचऱ्याजवळ सापडलेल्या बाळाला मिथुन चक्रवर्ती यांनी घेतलेले दत्तक

## दिशानी चक्रवर्ती आता 'या' क्षेत्रात करतेय काम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डिस्को किंग अशी मिथुन चक्रवर्ती यांची ओळख आहे. एक प्रसिद्ध अभिनेते म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांना तीन राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

पाच दशकांच्या कारकिर्दीत मिथुन चक्रवर्ती यांनी जवळजवळ ३५० हून अधिक चित्रपटांत काम केले आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी १९७६ ला 'मृगया' या चित्रपटातून पदार्पण केले होते. 'डिस्को डान्सर' या चित्रपटातून मिथून चक्रवर्ती यांना मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. १९८२ ला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटातून त्यांची बॉलीवूडमध्ये एक वेगळी ओळख निर्माण झाली.

मिथुन चक्रवर्ती यांनी 'अग्निपथ', 'प्यार झुकता नहीं', 'बाजी', 'वीर', 'डान्स डान्स', 'गोलमाल ३', 'द काश्मीर फाइल्स' अशा अनेक चित्रपटांत वेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या. अभिनय आणि त्यांच्या नृत्यामुळे मिथुन चक्रवर्ती यांचा एक वेगळा चाहतावर्ग निर्माण झाला. व्यावसायिक आयुष्याप्रमाणेच त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचीदेखील मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. मिथुन यांनी प्रथम अभिनेत्री हेलेना ल्यूक यांच्याशी विवाह केला. मात्र लग्नाच्या अवघ्या चार महिन्यांतच दोघे वेगळे झाले. त्यानंतर मिथुन यांनी १९७९ साली अभिनेत्री योगिता बाली यांच्याशी विवाह केला.

**दिशानी चक्रवर्ती कोणत्या क्षेत्रात करते काम?**

मिथुन चक्रवर्ती आणि योगिता यांना महाक्षय, नमाशी, उष्मेय आणि दिशानी अशी चार मुले आहेत. मात्र, दिशानीला या जोडप्याने दत्तक घेतले आहे.

दिशानीचा जन्म कोलकात्यात झाला होता. जन्मानंतर तिच्या पालकांनी तिला सोडून दिले होते. एका बंगाली वर्तमानपत्राने याबद्दल माहिती दिली होती, ज्यामध्ये एका लहान बाळ कचऱ्याजवळ सापडल्याचे लिहिले होते. स्थानिकांच्या ही गोष्ट लक्षात आली. त्यापैकी एकाने बाळाला घरी नेले, अशी माहिती दिली होती. मिथुन यांनी ही बातमी वाचली, त्यानंतर ते त्या मुलीला भेटण्यासाठी गेले. त्या बाळाला वाचवणाऱ्यांकडे त्यांनी बाळाला दत्तक घेण्याची इच्छा व्यक्त केली. पत्नी योगिता बाली यांनी त्यांना पाठिंबा दिला. बाळाला दत्तक घेण्याची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांनी बाळाला घरी आणले, तिचे नाव दिशानी असे ठेवले.

दिशानीला वडिलांप्रमाणेच अभिनय क्षेत्रात काम करायचे होते. तिने माध्यमिक शिक्षण भारतात पूर्ण केल्यानंतर ती पुढच्या शिक्षणासाठी अमेरिकेला गेली. दिशानीने न्यूयॉर्क फिल्म अकादमीमधून पदवीचे शिक्षण घेतले आहे.

२०१७ साली प्रदर्शित झालेल्या 'गिफ्ट' या शॉर्ट फिल्ममधून तिने हॉलीवूडमध्ये पदार्पण केले. 'होली स्मोक', 'अंडरपास', 'व्हाय डिड यू डू इट?' अशा शोमध्येदेखील ती महत्त्वाच्या भूमिकेत दिसली आहे. २०२२ साली प्रदर्शित झालेल्या 'द गेस्ट' या चित्रपटातील तिच्या भूमिकेचे प्रचंड कौतुक झाले.





हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



स्मृतिदिन विशेष

# दादासाहेब फाळके : स्वप्नद्रष्टे आणि युगप्रवर्तक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय चित्रपटसृष्टी आज जगातील सर्वांत मोठ्या आणि प्रभावी उद्योगांपैकी एक मानली जाते. या वैभवशाली प्रवासाची पायाभरणी ज्यांनी केली, त्या महान व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे दादासाहेब फाळके. त्यांचा सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी स्मृतिदिन. यानिमित्त या चित्रपटमहर्षींच्या कार्याचा आणि योगदानाचा आढावा घेणे म्हणजे भारतीय सिनेइतिहासाला अभिवादन करण्यासारखे आहे.

### सुरूवातीचा प्रवास

दादासाहेब फाळके यांचा जन्म ३० एप्रिल १८७० रोजी महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव धुंडिराज गोविंद फाळके. चित्रकला, छायाचित्रण आणि मुद्रणकलेत त्यांना विशेष प्रावीण्य होते. त्यांनी मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथे शिक्षण घेतले. पाश्चिमात्य चित्रपट पाहून त्यांनी भारतातही चित्रपट निर्मिती करावी, अशी महत्त्वाकांक्षा बाळगली. त्याकाळी चित्रपट हे भारतासाठी पूर्णपणे नवे माध्यम होते. अनेक अडचणी, आर्थिक संकटे आणि सामाजिक विरोध झेलत त्यांनी आपल्या ध्येयाकडे वाटचाल सुरू ठेवली.

### पहिला भारतीय चित्रपट

१९१३ साली त्यांनी भारतातील पहिला पूर्ण लांबीचा मूकपट राजा हरिश्चंद्र तयार केला. हा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया ठरला. या चित्रपटासाठी कलाकार मिळवणे, तांत्रिक साधने तयार करणे आणि संपूर्ण निर्मिती प्रक्रिया स्वतः सांभाळणे ही सर्व कामे त्यांनी प्रचंड जिद्दीने पूर्ण केली. त्या काळात स्त्रिया चित्रपटात काम करण्यास तयार नसल्यामुळे स्त्री पात्रांसाठी पुरुष कलाकारांची निवड करावी लागली, ही गोष्ट त्या काळातील सामाजिक परिस्थिती दर्शवते.

### पुढील कार्य आणि योगदान

'राजा हरिश्चंद्र'च्या यशानंतर त्यांनी अनेक ऐतिहासिक व पौराणिक विषयांवर चित्रपट निर्माण केले. त्यांच्या चित्रपटांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि नैतिक मूल्ये यांचे प्रभावी चित्रण आढळते. दादासाहेब फाळके यांनी सुमारे ९५ चित्रपट आणि २६ लघुपटांची निर्मिती केली. त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीला केवळ सुरुवातच दिली नाही, तर तांत्रिकदृष्ट्याही अनेक प्रयोग करून ती समृद्ध केली.

### 'दादासाहेब फाळके पुरस्कार' सर्वोच्च सन्मान

भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार त्यांच्या नावाने दिला जातो. दादासाहेब फाळके पुरस्कार हा सन्मान चित्रपट क्षेत्रातील आजीवन योगदानासाठी प्रदान केला जातो. हा पुरस्कार म्हणजे भारतीय सिनेसृष्टीतील सर्वोच्च गौरव मानला जातो.

### संघर्ष आणि चिकाटी

चित्रपट निर्मितीच्या सुरुवातीच्या काळात त्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागला. परंतु त्यांच्या ध्येयवेड्या वृत्तीमुळे त्यांनी कधीही हार मानली नाही. त्यांच्या कार्यामुळे भारतात एक स्वतंत्र आणि सशक्त चित्रपट उद्योग उभा राहिला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच पुढे मुंबई ही भारतीय चित्रपटसृष्टीची राजधानी बनली आणि भारतीय सिनेमा जागतिक स्तरावर पोहोचला.

### स्मृतिदिनाचे महत्त्व

१६ फेब्रुवारी १९४४ रोजी दादासाहेब फाळके यांचे निधन झाले. त्यांचा स्मृतिदिन म्हणजे भारतीय चित्रपटसृष्टीसाठी प्रेरणादायी क्षण आहे. त्यांच्या कार्याची आठवण करून देणारा हा दिवस नव्या पिढीतील कलाकार आणि तंत्रज्ञांना सृजनशीलतेची प्रेरणा देतो. दादासाहेब फाळके हे केवळ चित्रपट निर्माते नव्हते, तर ते एक स्वप्नद्रष्टे आणि युगप्रवर्तक होते. त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीला दिशा, ओळख आणि आत्मविश्वास दिला.

**त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना**
**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे**
**विनम्र अभिवादन.**



# जिन्होंने अपने राष्ट्र को बचाने के लिए...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हल्दीघाटी के युद्ध में आर्थिक वजह के कारण हार के कगार पे पहुँचे महाराणा प्रताप को व उनकी सेना को इतना धन दिया की उनके २५००० सैनिको की १० वर्षो तक राशन व अन्य जरूरते पूरी हो सके वो भी मुगलो के दिल्ली की गद्दी सौपने के प्रलोभन को ठुकराते हुए..आज भी राज्यस्थान में जहाँ जहाँ महाराणा प्रताप की स्मारक है वहाँ भामाशाह की भी मूर्तिया लगाई जाती है..ऐसे महान राष्ट्रभक्त भामाशाह को शत् शत् नमन...

भामाशाह (१५४७ - १६००) बाल्यकाल से मेवाड़ के राजा महाराणा प्रताप के मित्र, सहयोगी और विश्वासपात्र सलाहकार थे। अपरिग्रह को जीवन का मूलमन्त्र मानकर संग्रहण की प्रवृत्ति से दूर रहने की चेतना जगाने में आप सदैव अग्रणी रहे। मातृ-भूमि के प्रति अगाध प्रेम था और दानवीरता के लिए भामाशाह नाम इतिहास में अमर है।



### भामाशाह

दानवीर भामाशाह का जन्म राजस्थान के मेवाड़ राज्य में वर्तमान पाली जिले के सादड़ी गांव में २८ जून १५४७ को ओसवाल जैन परिवार में हुआ। उनके पिता का नाम भारमल था जो रणथम्भौर के किलेदार थे। भामाशाह का निष्ठापूर्ण सहयोग महाराणा प्रताप के जीवन में महत्वपूर्ण और निर्णायक साबित हुआ। मातृ-भूमि की रक्षा के लिए महाराणा प्रताप का सर्वस्व होम हो जाने के बाद भी उनके लक्ष्य को सर्वोपरि मानते हुए अपनी सम्पूर्ण धन-संपदा अर्पित कर दी। यह सहयोग तब दिया जब महाराणा प्रताप अपना अस्तित्व बनाए रखने के प्रयास में निराश होकर परिवार सहित पहाड़ियों में छिपते भटक रहे थे। मेवाड़ के अस्मिता की रक्षा के लिए दिल्ली गद्दी का प्रलोभन भी ठुकरा दिया। महाराणा प्रताप को दी गई उनकी हरसम्भव सहायता ने मेवाड़ के आत्म सम्मान एवं संघर्ष को नई दिशा दी।

भामाशाह अपनी दानवीरता के कारण इतिहास में अमर हो गए। भामाशाह के सहयोग ने ही महाराणा प्रताप को जहाँ संघर्ष की दिशा दी, वहीं मेवाड़ को भी आत्मसम्मान दिया। कहा जाता है कि जब महाराणा प्रताप अपने परिवार के साथ जंगलों में भटक रहे थे, तब भामाशाह ने अपनी सारी जमा पूंजी महाराणा को समर्पित कर दी। तब भामाशाह की दानशीलता के प्रसंग आसपास के इलाकों में बड़े उत्साह के साथ सुने और सुनाए जाते थे।

